| 554 | राष्ट्रीय वीज कामगार सहकारी पतसंस्था मर्या. अ.नगर ता.जि.अ.नगर | बांदल रावसाहेब रंगनाथ | 2082 |
| 555 | दत्ताराम कैकाडी मजूर सहकारी संस्था मर्या, नालेगाव अ.नगर, ता.जि. अ.नगर | बुरा संतोष व्यंकटेश | 2526 |
| 556 | श्री सदगुरु मजूर सहकारी संस्था मर्या सोनेवाडी ता.जि. अ.नगर | बेरड केशव भगवानराव | 2045 |
| 557 | भिंगार नागरी सहकारी पत संस्था मर्या भिंगार ता.जि.अ.नगर | बेरड केशव रामचंद्र | 2324 |
| 558 | लक्ष्मी नारायण सहकारी नागरी पत संस्था मर्या. अ.नगर ता.जि.अ.नगर | बोगावत प्रतिक दिलीप | 5560 |
| 559 | लक्ष्मण वडार मजूर सहकारी संस्था मर्या देऊळगाव सिध्दी ता.जि. अ.नगर | बोठे लक्ष्मण गंगाधर | 1984 |
| 560 | स्वास्तिक मजूर सहकारी संस्था मर्या, अ. नगर, ता.जि. अ.नगर | बोरुडे अपेक्षा वैभव | 1657 |
| 561 | अहमदनगर जिल्हा मजूर सहकारी संस्था संघ मर्या अ.नगर ता.जि.अहमदनगर . | बोरुडे अर्जुनराव मल्हारी | 1494 |
| 562 | विनायक मजूर सहकारी संस्था मर्या सावेडी ता.जि. अ.नगर | बोरुडे प्रकाश पांडुरंग | 3474 |
| 563 | गायत्री मजूर सहकारी संस्था मर्या, सावेडी अ.नगर, ता.जि. अ.नगर | बोरुडे प्रदिप हरिभाऊ | 5354 |
| 564 | श्री साई मजूर सहकारी संस्था मर्या, सबजेल चौक , ता.जि. अ.नगर | बोरुडे राजु खंडू | 4152 |
| 565 | बालाजी फर्निचर व इले मजूर सहकारी संस्था मर्या, मार्केट यार्ड अ.नगर , ता.जि. अ.नगर | बोरुडे राहुल साहेबराव | 7060 |
| 566 | सरस्वती नागरी सहकारी पतसंस्था मर्या.अ. नगर ता.जि.अ.नगर | बोरुडे वैभव अर्जुनराव | 6777 |
| 567 | श्री चोंण्डेश्वरी नागरी सहकारी पत संस्था मर्या. भिंगार ता.जि.अ.नगर | बोळे शाम मुरलीधर | 3529 |
| 568 | जवाहर मजूर सहकारी संस्था मर्या, अ.नगर, ता.जि. अ.नगर | भगत बाबासाहेब छगन | 1798 |
| 569 | औदुंबर नागरी सहकारी पत संस्था मर्या. भिंगार ता.जि.अ.नगर | भंडारी ईश्वर सदाशिव | 3632 |
| 570 | दि अहमदनगर जैन ओसवाल को-ऑप क्रेडीट सोसायटी लि. अ.नगर ता.जि.अ.नगर | भंडारी किरणजी पोपटलालजी | 1813 |
| 571 | श्री नृसिंह मजूर सहकारी संस्था मर्या, चास ता.जि. अ.नगर | भरेकर राजेश जगन्नाथ | 5168 |
| 572 | श्री गणेश मजूर सहकारी संस्था मर्या, राळेगण, ता.जि. अ.नगर | भापकर सुधाकर दादासाहेब | 1780 |
| 573 | वैभव नागरी सहकारी पत संस्था मर्या. राळेगण ,ता.जि.अहमदनगर | भापकर सुधिर विश्वासराव | 3525 |
| 574 | वीज तांत्रिक कामगार सहकारी पतसंस्था मर्या.अ.नगर | भुजबळ सतिश जगन्नाथ | 5159 |
| 575 | श्री संत सावतामाळी ग्रामीण बिगर शेती सहकारी पत संस्था मर्या पिंपळगाव माळवी ता.जि.अ.नगर | भोंदे दत्तात्रय आसाराम | 5992 |
| 576 | राणी लक्ष्मी महिला ग्रामीण बिगर शेती सहकारी पत संस्था मर्यादित अकोळनेर ता. जि.अ.नगर | भोर कांताबाई निवृत्ती | 6503 |
| 577 | स्व शंकरराव घुले माथाडी कामगारांची सहकारी पत संस्था मर्या मार्केट यार्ड ता.जि. अ.नगर | भोसले रविंद्र रामचंद्र | 1922 |
| 578 | वनकर्मचारी सहकारी पत संस्था मर्या अ. नगर ता.जि.अहमदनगर . | मंचरे बबन उत्तमराव | 2851 |
| 579 | सी.क्यु.ए.व्ही.सिव्हिलियन सेवक सहकारी पतसंस्था मर्या अ.नगर | मदने निलेश सुरेश | 1809 |
| 580 | सिंधु नागरी सहकारी पत संस्था मर्यादित अ. नगर ता.जि.अ.नगर | मध्यान महेश गिरधारीलाल | 6347 |
| 581 | अहमदनगर मिरची मर्चंट नागरी सहकारी पत संस्था मर्या.अ.नगर ता.जि.अ.नगर | मनियार किरण हरिकिसन | 5514 |
| 582 | अहमदनगर जिल्हा मराठा सेवा नागरी सहकारी पतसंस्था मर्या.अ.नगर ता.जि.अ. नगर | मरकड किशोर मोहनराव | 6066 |
| 583 | अनुदान प्राप्त खाजगी प्राथमिक शिक्षक व सेवकांची सहकारी पत संस्था् मर्या अ.नगर | महाजन अजय शरद | 3333 |
| 584 | शंकर माथाडी हमाल कामगार मजूर सहकारी संस्था मर्या, अ.नगर, ता.जि. अ. नगर | महारनवर भरत किसन | 1976 |
| 585 | अहिल्यानगर महानगर पालिका कर्मचारी सहकारी पत संस्था मर्या अ.नगर ता.जि. अहमदनगर . | मुदगल बाबासाहेब भिमराज | 1595 |
| 586 | मारुती मजूर सहकारी संस्था मर्या अरणगाव ता.जि. अ.नगर | मुदळ सुखदेव शामराव | 2002 |
| 587 | वृदांवन सहकारी गृहनिर्माण संस्था मर्या सावेडी ता.जि.अ.नगर | मुळे अरविंद नारायण | 1486 |

क्रमशः

## थोडक्यात पण महत्त्वाचे

### पोकलेन मशीन चे अडीच लाख रुपयांचे नुकसान तसेच

**डिझेल चोरी; अज्ञात चोरट्यांकडून दोन लाख ६५ हजार रुपयांचे नुकसान**

मंचर (समर्थ गांवकरी)

महाळुंगे पडवळ (ता. आंबेगाव) येथील वेताळबा मंदिराजवळील खडी क्रेशरच्या जागेवर उभ्या असलेल्या पोकलेन मशीनचे कुलूप तोडून अज्ञात चोरट्यांनी सुमारे १५० लिटर डिझेल चोरले. तसेच मशीनचे मॉनिटर, वातानुकूलन यंत्रणेचे प्लास्टिक पॅनेल व पत्रे तोडून सुमारे अडीच लाख रुपयांचे असे एकूण दोन लाख ६५ हजार रुपयांचे

नुकसान केल्याची घटना १८ ते १९ रोजी सकाळी घडली. या संदर्भात मंचर

पोलीस ठाण्यात शनिवार दिनांक १९ रोजी दुपारी अज्ञात चोरट्याच्या विरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. याबाबत गिरवली येथील भाऊसाहेब बंडू पाटील (वय ४८) यांनी मंचर पोलीस ठाण्यात फिर्याद दिली आहे. त्यांच्याकडे असलेले पोकलेन मशीन महाळुंगे पडवळ येथील खडी क्रेशरच्या ठिकाणी भाडेतत्त्वावर देण्यात आले होते. १८ सप्टेंबर रोजी सायंकाळी साडेसहाच्या सुमारास काम पूर्ण झाल्यानंतर चालक रोहित कुमार यादव याने मशीन तेथे उभे करून कुलूप लावले होते.

### गणेशोत्सवासाठी राजूर पोलिसांचा रूट मार्च

**संवेदनशील भागांत कडेकोट बंदोबस्त**



राजूर (समर्थ गांवकरी)

गणेशोत्सवाच्या पार्श्वभूमीवर कायदा व सुव्यवस्था अबाधित ठेवून नागरिकांमध्ये सुरक्षिततेची भावना निर्माण करण्यासाठी शनिवारी राजूर शहरातून पोलिसांचा रूट मार्च काढण्यात आला.उत्सव काळात पोलिस यंत्रणा सज्ज असल्याचा संदेश या माध्यमातून देण्यात आला. पोलीस अधीक्षक मुमक्का सुदर्शन यांच्या आदेशानुसार विभागीय अधिकारी सोमनाथ वाकचौरे व पोलीस उपविभागीय अधिकारी डॉ कुणाल सोनवणे यांच्या मार्गदर्शनाखाली राजुर बाजारपेठेतून रूट मार्चला सुरुवात झाली.दत्त मंदिर ,मुख्य बाजारपेठ, महादेव मंदिर पिचड साहेब बंगला रोडमार्गे पुन्हा राजूर पोलीस ठाणे असा मार्ग होता. रूट मार्चमध्ये सहाय्यक पोलीस निरीक्षक किशोर पवार ,पोलीस उपनिरीक्षक परसराम तागड पोलीस उपनिरीक्षक १७ पोलीस अंमलदार आणि २३ होमगार्ड, असे एकूण ४१ जवान सहभागी झाले. गणेशोत्सवात अनुचित प्रकार टाळण्यासाठी प्रमुख चौक, बाजारपेठ, संवेदनशील भाग व गणेश मंडळांच्या परिसरात पोलिस बंदोबस्त वाढविण्यात आला आहे. नागरिकांनी निर्भयपणे उत्सव साजरा करावा, तसेच अफवा व गैरसमजांवर विश्वास न ठेवता संशयास्पद बाब आढळल्यास तत्काळ पोलिसांशी संपर्क साधावा, असे आवाहन करण्यात आले. दरम्यान, गणेशोत्सव शांततेत साजरा करा गणेश मंडळांनी प्रशासनाला सहकार्य करून शासनाच्या नियमांचे काटेकोर पालन करावे. डीजेवर बंदी असल्याने पारंपरिक वाद्यांचा वापर करावा. नियमांचे उल्लंघन केल्यास कायदेशीर कारवाई केली जाईल, असा इशारा सहायक पोलीस निरीक्षक किशोर पवार यांनी दिला.

**सिद्धिविनायकाच्या जाणाऱ्या भाविकांसाठी महत्त्वाची बातमी**

### मंदिर परिसरात वाहतुकीचे निर्बंध



मुंबई (समर्थ गांवकरी)

मुंबईतील प्रभादेवी परिसरामध्ये असलेल्या सिद्धिविनायक मंदिराच्या परिसरामध्ये २९ सप्टेंबरला वाहतूक पोलिसांकडून निर्बंध लावण्यात आले आहेत. येत्या २९ सप्टेंबरला अंगारकी चतुर्थी आहे. अंगारकी चतुर्थी आणि संकष्टी चतुर्थीच्या दिवशी मंदिरामध्ये मोठ्या प्रमाणावर भाविक उपस्थिती लावत असतात. हिच भाविकांची गर्दी लक्षात घेता मुंबई वाहतूक पोलिसांनी मंदिर परिसरामध्ये वाहतूकीसंबंधित निर्बंध लावले आहेत. यामुळे भाविकांना मंदिराच्या परिसरामध्ये येताना समस्यांना तोंड द्यावी लागण्याची शक्यता आहे.

अंगारकी चतुर्थीच्या दिवशी सिद्धिविनायक मंदिर परिसरामध्ये सकाळी ६ ते मध्यरात्री १२ वाजेपर्यंत निर्बंध लागू करण्यात आले आहेत. भाविकांच्या सुरक्षेसाठी गरज भासल्यास परिसरामध्ये वाहतूकीचे निर्बंध आणखीन वाढवले जाण्याची शक्यता असल्याची माहिती वाहतूक विभागाच्या पोलीस उपआयुक्त (मुख्यालय आणि मध्य) डॉ. दिपाली धाटे यांनी माहिती दिली आहे. स्वातंत्र्यवीर सावरकर रोड, एस.के. बोले रोड, गोखले रोड (दक्षिण आणि उत्तर), काकासाहेब गाडगीळ मार्ग, सायेणी रोड, आप्पासाहेब मराठे मार्ग या प्रमुख रस्त्यांवर मोठ्या प्रमाणावर वाहनांची रहदारी असते.

# वन चेतना फाउंडेशनच्या पुढाकाराने ब्राम्हणवाड्यात सर्व रोग निदान आरोग्य शिबिर उत्साहात संपन्न!

## नरेंद्र मोदी यांच्या 'सेवा संकल्प' अभियानाची प्रेरणा; ब्राम्हणवाड्यात वन चेतना फाउंडेशनच्या पुढाकाराने आरोग्य शिबिर!

ब्राम्हणवाडा (समर्थ गांवकरी)

वन चेतना फाउंडेशन, प्राथमिक आरोग्य केंद्र ब्राम्हणवाडा, श्री दत्त क्लिनिक, प्रयास क्लिनिक आणि एस.एम.बी.टी. डेंटल कॉलेज, संगमनेर यांच्या संयुक्त विद्यमाने शनिवार, दि. १९ सप्टेंबर रोजी जिल्हा परिषद प्राथमिक शाळा, ब्राम्हणवाडा येथे सर्व रोग निदान आरोग्य शिबिर उत्साहात संपन्न झाले. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या वाढदिवसानिमित्त देशभर सुरू असलेल्या 'सेवा संकल्प अभियान' अंतर्गत सेवाभावी उपक्रमांना चालना देण्याच्या उद्देशाने या आरोग्य शिबिराचे आयोजन करण्यात आले. परिसरातील नागरिक व विद्यार्थ्यांनी शिबिराला उत्स्फूर्त प्रतिसाद दिला.

शिबिरात विविध आजारांची प्राथमिक तपासणी, उंची–वजन व बीएमआय तपासणी, रक्त तपासणी, दंत तपासणी तसेच डॉक्टरांचा सल्ला आणि आरोग्यविषयक मार्गदर्शन करण्यात आले. नागरिकांना निरोगी जीवनशैलीबाबत मार्गदर्शन करत 'निरोगी बालक, निरोगी समाज' हा संदेश देण्यात आला. शिबिराचे उद्घाटन व अध्यक्षस्थान ग्रामपंचायत ब्राम्हणवाड्याचे उपसरपंच सुभाष गायकर यांनी भूषविले.

यावेळी ग्रामपंचायत सदस्य रवींद्र हांडे, शिवाजी आरोटे, भारत आरोटे, वन चेतना फाउंडेशनचे अध्यक्ष पंढरीनाथ पाबळे, केंद्रप्रमुख संदीप लबडे, प्राथमिक आरोग्य केंद्राचे अधिकारी डॉ. विवेक घायाळ, डॉ. प्रदीप कुमकर, डॉ. निलेश कडाळी, डॉ. सतीश वाळुंज, माजी पंचायत समिती सदस्य राखीताई गांधी, ज्ञानदेव फलके, डॉ. सुधीर गायकर, सागर गायकर, भरत आरोटे, गोरख पावडे, गणेश फापाळे आदी मान्यवर उपस्थित होते.

गटशिक्षणाधिकारी दीपक धुमाळ व शिक्षण विस्तार अधिकारी राजेश पावसे यांच्या मार्गदर्शनाखाली विभागातील शिक्षकांनीही शिबिरासाठी सहकार्य केले. दत्तात्रेय गोपाळे सर, राहुल देशमुख, प्रशांत अभंग, बाळासाहेब आरोटे, वाघ सर यांच्यासह परिसरातील शिक्षकवृंद उपस्थित होते. शिबिराच्या यशस्वी आयोजनासाठी अदित पांडे यांच्या ओम साई पॅथॉलॉजी, तुषार हुलवळे यांच्या साई पॅथॉलॉजी लॅब, ब्राम्हणवाडा, प्राथमिक आरोग्य केंद्रातील आरोग्य कर्मचारी, डॉ. अनिकेत फड, एस.एम.बी. टी. डेंटल कॉलेज संगमनेर, श्री दत्त क्लिनिक व प्रयास क्लिनिकमधील डॉक्टर व कर्मचाऱ्यांचे मोलाचे सहकार्य लाभले. वन चेतना फाउंडेशनच्या सर्व सदस्यांनी एकजुटीने पुढाकार घेत नियोजनापासून ते शिबिराच्या प्रत्यक्ष अंमलबजावणीपर्यंत जबाबदारीने सहभाग घेत अथक परिश्रम केले. प्रत्येक सदस्याच्या सामूहिक प्रयत्नांमुळे हा सेवाभावी उपक्रम यशस्वीपणे पूर्णत्वास गेला. नागरिकांना आरोग्यसेवा उपलब्ध करून देण्यासोबतच आरोग्यविषयक जनजागृती करण्याचा उद्देशही साध्य झाला. वन चेतना फाउंडेशनच्या सर्व





सदस्यांच्या सेवाभावी वृत्तीला वैद्यकीय पथक, आरोग्य कर्मचारी, शिक्षक व सहभागी संस्थांचे सहकार्य लाभल्याने हा उपक्रम संस्मरणीय ठरला.

## डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जीवनावरील चित्रपटाच्या चित्रीकरणाचा शुभारंभ!

ठाणे (समर्थ गांवकरी)

डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जीवनकार्यावर आधारित चित्रपटाच्या चित्रीकरणाचा शुभारंभ १९ सप्टेंबर रोजी शेठ एन.के.टी. बँक्वेट हॉल येथे श्री. नानजीभाई खीमजीभाई ठक्कर ठाणावाला यांच्या शुभहस्ते कॅमेऱ्याचे उद्घाटन करून करण्यात आला. यावेळी उपस्थित मान्यवरांनी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या कार्याला अभिवादन केले.

यावेळी बोलताना नानजीभाई ठक्कर यांनी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी भारताला राज्यघटना देण्याबरोबरच शिक्षण, सामाजिक समता आणि प्रगतीचा मार्ग दाखविला, असे सांगितले. बाबासाहेबांनी प्रतिकूल परिस्थितीत परदेशात जाऊन उच्च शिक्षण घेतले



आणि बॅरिस्टरची पदवी मिळवली. त्यामुळे समाजातील प्रत्येक घटकाने शिक्षणाला प्राधान्य देत व्यसनांपासून दूर राहून प्रगतीच्या दिशेने वाटचाल करावी, असे आवाहन त्यांनी केले. या चित्रपटातून बाबासाहेबांच्या विचारांचा आणि संघर्षाचा संदेश लाखो लोकांपर्यंत पोहोचेल, असा विश्वासही त्यांनी व्यक्त केला. या चित्रपटाचे निर्माते–दिग्दर्शक श्री. लक्ष्मण मोरे, श्री. राजेश गायकवाड, श्री. भास्कर हिमप्रा शेट्टी, लेखिका व अभिनेत्री सौ. वंदना, श्री. महेंद्र सोनावणे, श्री. सुनील जगताप, श्री. राजेश पडवळे, श्री. रोहित पिसाळकर आदी उपस्थित होते. चित्रपटात डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जीवनातील विविध प्रसंग आणि सामाजिक कार्य मांडण्यात येणार आहे. चित्रपटाचे पुढील चित्रीकरण सोलापूर येथे होणार असून, चित्रीकरण पूर्ण झाल्यानंतर २०२७ मध्ये चित्रपट प्रेक्षकांच्या भेटीला येणार आहे.

## पारनेर पंचायत समितीत आमदार काशिनाथ दातेंच्या अध्यक्षतेखाली टंचाई आढावा बैठक

पारनेर(समर्थ गांवकरी)

पारनेर नगर विधानसभा मतदारसंघाचे आमदार काशिनाथ दाते यांच्या अध्यक्षतेखाली पारनेर पंचायत समिती सभागृहात टंचाई आढावा बैठक घेण्यात आली. तालुक्यातील सद्य टंचाई परिस्थिती, पाणीपुरवठा व्यवस्था, उपलब्ध पाणीसाठा तसेच नागरिक व शेतकऱ्यांना भेडसावणाऱ्या विविध समस्यांचा बैठकीत आढावा घेण्यात आला.टंचाईच्या पार्श्वभूमीवर तालुक्यातील विविध गावांमध्ये पाणीपुरवठा सुरळीत ठेवण्यासाठी आवश्यक उपाययोजना, उपलब्ध पाणीसाठ्याची स्थिती आणि नागरिकांना दिल्या जाणाऱ्या सुविधांबाबत संबंधित विभागाच्या अधिकाऱ्यांकडून माहिती घेण्यात आली.

तसेच शेतकऱ्यांच्या अडचणी, पिण्याच्या पाण्याचा प्रश्न आणि टंचाईच्या काळात आवश्यक असलेल्या उपाययोजनांवर चर्चा करण्यात आली. टंचाई परिस्थितीत नागरिक व शेतकऱ्यांच्या अडचणी प्रशासनापर्यंत पोहोचवून त्यावर तातडीने आवश्यक कार्यवाही करण्याच्या दृष्टीने बैठकीत विविध मुद्द्यांवर चर्चा झाली. संबंधित विभागांनी तालुक्यातील परिस्थितीवर सातत्याने लक्ष ठेवून आवश्यक उपाययोजना करण्याबाबतही आढावा घेण्यात आला. यावेळी राष्ट्रवादी काँग्रेसचे जिल्हाध्यक्ष अशोकराव सावंत, जिल्हा परिषदेचे माजी सदस्य विश्वनाथदादा कोरडे, भाजपचे पदाधिकारी राहुल पाटील शिंदे, राष्ट्रवादी काँग्रेसच्या जिल्हा कार्याध्यक्षा सुधामती कवाद, तालुकाध्यक्ष विक्रमसिंह कळमकर, महिला तालुकाध्यक्ष सुषमा रावडे, नगरसेवक अशोक चेडे, भाजपचे जिल्हा सरचिटणीस सुभाष दुधाडे, राष्ट्रवादीचे तालुका पदाधिकारी अरुण राजदेव यांच्यासह पंचायत समितीचे गटविकास अधिकारी दिलीप सोनकुसळे, विविध विभागांचे अधिकारी व पत्रकार उपस्थित होते. बैठकीत टंचाईच्या पार्श्वभूमीवर विविध विभागांमध्ये समन्वय साधून नागरिकांना आवश्यक सुविधा उपलब्ध करून देण्यावर भर देण्यात आला.

# राहाता नगरपरिषदेला २० टनी वजन काट्याची सुविधा

## घनकचरा वाहतुकीतील वेळ व इंधनाची होणार बचत; स्वच्छतेच्या दिशेने महत्त्वाचे पाऊल

राहाता (समर्थ गांवकरी)

राहाता नगरपरिषदेच्या घनकचरा प्रकल्पाच्या ठिकाणी 'नगरोत्थान योजने'अंतर्गत नव्याने उभारण्यात आलेल्या २० टन क्षमतेच्या वजन काट्याचे उद्घाटन नगराध्यक्ष डॉ. स्वाधीन गाडेकर, उपनगराध्यक्ष डॉ. विजय सदाफळ तसेच सर्व सन्माननीय नगरसेवक यांच्या हस्ते करण्यात आले. या नव्या सुविधेमुळे नगरपरिषदेच्या कचरा वाहतुकीतील वेळ आणि इंधनाची मोठी बचत होणार असून, शहराच्या स्वच्छतेच्या दिशेने हे महत्त्वाचे पाऊल मानले जात आहे.

> १ तारखेपासून राहाता नगरपरिषदेने शहरातील स्वच्छतेच्या नियोजनात आणि कर्मचाऱ्यांच्या कार्यपद्धतीत काही सकारात्मक बदल केले आहेत. या बदलांचे परिणाम आता दिसू लागले असून, शहरातील घनकचरा संकलन अधिक प्रभावीपणे केले जात आहे. ना. डॉ. राधाकृष्ण विखे पाटील यांच्या संकल्पनेतील 'स्वच्छ आणि सुंदर राहाता शहर' निर्माण करण्याच्या दृष्टीने वजन काट्याची सुविधा हे महत्त्वाचे पाऊल.
>
> **डॉ. स्वाधीन गाडेकर ,नगराध्यक्ष**

यापूर्वी राहाता नगरपरिषदेकडे स्वतः चा वजन काटा उपलब्ध नसल्याने घनकचरा वाहून नेणाऱ्या वाहनांना वजन करण्यासाठी शहराबाहेर जावे लागत होते. त्यामुळे वाहनांचा अतिरिक्त फेरा वाढत होता. परिणामी वेळेबरोबरच इंधनाचा खर्चही वाढत होता. नगरपरिषदेवरील हा अतिरिक्त आर्थिक भार कमी करण्याच्या उद्देशाने घनकचरा प्रकल्पाच्या ठिकाणी २० टन क्षमतेचा वजन काटा उभारण्यात आला आहे.

या वजन काट्याच्या ठिकाणी सीसीटीव्ही कॅमेरे बसविण्यात आले असून, येणाऱ्या–जाणाऱ्या वाहनांवर तसेच त्यांच्या वजनावर पारदर्शक नियंत्रण ठेवणे शक्य होणार आहे. वाहनांना वजनासाठी शहराबाहेर जाण्याची आवश्यकता राहणार नसल्याने इंधन आणि वाहतूक खर्चातही बचत होणार आहे. राज्याचे जलसंपदा व पालकमंत्री ना. डॉ. राधाकृष्ण विखे पाटील आणि भाजपचे प्रदेश उपाध्यक्ष डॉ. सुजय दादा विखे पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली या प्रकल्पाची अंमलबजावणी करण्यात आली. उद्घाटनप्रसंगी नगराध्यक्ष डॉ. स्वाधीन गाडेकर, उपनगराध्यक्ष डॉक्टर विजय सदाफळ, गटनेते मुन्ना शाह, माजी नगराध्यक्ष कैलास बापू सदाफळ, नगरसेवक आग्रे, सदाफळ, तुपे, गाडेकर, बोरकर, पाळंदे, रुणवाल, गुड्डू बनकर, विजय गिधाड, वीरभद्र देवालय ट्रस्टचे अध्यक्ष जबाजी मेचे, उपाध्यक्ष विजय सदाफळ, रावसाहेब धुमसे, संजय भाकरे,



जालू गिधाड, नगरपरिषदेचे कर्मचारी रविंद्र बोठे, राहुल खलीपे तसेच परिसरातील नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## वूशूच्या जिल्हास्तरीय स्पर्धेत चगड कॉलेजचा दबदबा; चार सुवर्णवीरांसह सहा खेळाडूंची विभागीय स्पर्धेसाठी निवड



श्रीगोंदा (समर्थ गांवकरी)

जामखेड येथील ल. ना. होशिंग माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयात १६ सप्टेंबर रोजी झालेल्या शालेय जिल्हास्तरीय वूशू स्पर्धेत महाराजा जिवाजीराव शिंदे महाविद्यालयाच्या खेळाडूंनी दमदार कामगिरी करत चार सुवर्णपदकांसह एकूण सहा पदके पटकावली. या यशाच्या जोरावर महाविद्यालयाच्या सहा खेळाडूंची विभागीय स्पर्धेसाठी निवड झाली आहे.

१९ वर्षांखालील मुलांच्या गटात कृष्णा वायकर (७० किलो) व सार्थक काळे (८० किलो) यांनी प्रथम क्रमांक पटकावत सुवर्णपदकावर नाव कोरले. प्रभू जामदार (६० किलो) व सार्थक खेतमाळीस (९० किलो) यांनी द्वितीय क्रमांक मिळवून रौप्यपदकाची कमाई केली. तर १७ वर्षांखालील मुलांच्या गटात वेदांत भापकर (६५ किलो) व प्रज्वल ढवळे (८० किलो) यांनी प्रथम क्रमांक मिळवत सुवर्णपदके जिंकली. या उल्लेखनीय कामगिरीमुळे सहाही खेळाडूंना विभागीय स्पर्धेत जिल्ह्याचे प्रतिनिधित्व करण्याची संधी मिळाली आहे.

या यशाबद्दल महाविद्यालय विकास समितीचे चेअरमन माजी आमदार बबनराव पाचपुते, मॅनेजिंग कौन्सिल सदस्य बाबासाहेब भोस, माजी आमदार राहुल जगताप, सदस्य महावीर पटवा, प्राचार्य डॉ. प्रकाश साळवे, वरिष्ठ उपप्राचार्य डॉ. सुदाम भुजबळ व डॉ. नितीन थोरात, कनिष्ठ उपप्राचार्य प्रा. श्रीकांत थोरात, पर्यवेक्षक प्रा. रत्नाकर झिटे तसेच विभागप्रमुख, शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी खेळाडूंचे अभिनंदन करून पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या.

रजि. नं. : एनआर/एसजीए/आरएसआर/सीआर/१२२३/१९९७ रजि. दि. २०/०९/१९९७

**आनंद सहकारी नागरी पतसंस्था मर्यादित, श्रीगोंदा**

**ता. श्रीगोंदा जि. अहिल्यानगर**

पत्ता :– होळी गल्ली, मु. पो. ता. श्रीगोंदा जि. अहिल्यानगर फोन : ०२४८७–२२०२९८ जा. क्र. : दि. १२/०९/२०२६

**वार्षिक सर्वसाधारण सभेची नोटीस**

**(फक्त सभासदांकरीता)**

आनंद सहकारी नागरी पतसंस्था मर्यादित, श्रीगोंदा, ता. श्रीगोंदा जि. अहिल्यानगर या संस्थेच्या सर्व सभासद बंधु–भगिनींना कळविण्यात येते की, आपल्या संस्थेची ३० वी वार्षिक सर्वसाधारण सभा शनिवार दि. २६/०९/२०२६ रोजी दुपारी ३.०० वा. **बालाजी मंगल कार्यालय, बाजारतळ, श्रीगोंदा** जि. अहिल्यानगर येथे संस्थेचे विद्यमान चेअरमन **मा. श्री. सुरेश कांतीलाल भंडारी** यांचे अध्यक्षतेखाली आयोजित करण्यात आलेली आहे. तरी सदर सभेस सर्व सभासदांनी वेळेवर उपस्थित राहावे ही विनंती.

**– सभेपुढे येणारे विषय –**

१) मागील दिनांक २७/०९/२०२५ रोजी झालेल्या सर्वसाधारण सभेचे इतिवृत्त वाचुन कायम करणे.

२) संस्थेची दिनांक ३१/०३/२०२६ रोजी संपलेल्या आर्थिक वर्षाची हिशोब पत्रके (तेरीजपत्रक, नफाटोटा पत्रक, ताळेबंद पत्रक) वाचुन त्यास मान्यता देणे.

३) मा. संचालक मंडळाने केलेल्या नफा वाटणीस मंजुरी देणे.

४) संस्थेच्या सन २०२६–२७ च्या अंदाजपत्रकास मान्यता देणे व सन २०२५–२६ च्या कमी जास्त झालेल्या खर्चास मंजुरी देणे.

५) थकबाकी वसुली बाबत विचार विनिमय करणे व थकीत कर्जदारांना दिलेल्या सवलतीस मान्यता देणे.

६) महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० चे कलम ७५ (२) मधील तरतुदीनुसार व्यवस्थापक समिती सदस्यांना व त्यांच्या कुटुंबियांना दिलेल्या कर्जे व वसुलीच्या पत्रकांची नोंद घेणे.

७) सन २०२४–२०२५ च्या दोष दुरुस्ती अहवालाची नोंद घेणे.

८) मागील लेखापरीक्षण अहवालाची नोंद घेणे व सन २०२६–२०२७ साठी लेखापरीक्षकाची नेमणूक करणे.

९) सभासदांना सहकार शिक्षण व प्रशिक्षण देणे.

१०) संस्थेच्या २९ व्या वार्षिक सर्वसाधारण सभेस (अधिमंडळाची वार्षिक सभा) अनुपस्थित असलेल्या सभासदांची अनुपस्थिती क्षमापित करणे.

११) गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार करणे.

१२) मा. अध्यक्षांच्या परवानगीने ऐनवेळी येणाऱ्या विषयावर चर्चा करणे.

**– आपले नम्र –**

| श्री. सुभाष किसन तरटे | श्री. चंद्रकांत ताराचंद कटारिया | श्री. सुरेश कांतीलाल भंडारी |
| --- | --- | --- |
| सचिव | व्हॉ. चेअरमन | चेअरमन |

**टीप :–** १) सभासदांना संस्थेसंबंधी विचारावयाचे प्रश्न अथवा सुचना सभेच्या ०७ दिवस अगोदर लेखी स्वरुपात पाठवावेत. ऐनवेळी आलेल्या सुचनांचा अथवा प्रश्नांचा विचार केला जाणार नाही.

२) संस्थेचा ताळेबंद, नफा–तोटा पत्रक, तेरीज पत्रक संस्थेच्या कार्यालयात कामकाजाच्या वेळेत सुट्टीचा दिवस सोडून पाहता येतील.

३) कोरम अभावी सभा तहकूब झाल्यास ती सभा त्याच ठिकाणी अर्धा तास थांबून पुन्हा सुरु करणेत येईल.

# थोडक्यात पण महत्त्वाचे

## अहिल्यानगरच्या शासकीय वैद्यकीय महाविद्यालयात १०० विद्यार्थ्यांना प्रवेशास परवानगी

**अहिल्यानगर (समर्थ गांवकरी)**



पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांच्या नावाने सुरू होणार्या अहिल्यानगरच्या पहिल्या शासकीय वैद्यकीय महाविद्यालयातील विद्यार्थ्यांच्या प्रवेशाचा मार्ग अखेर मोकळा झाला आहे. शैक्षणिक वर्ष २०२६-२७ साठी दरवर्षी १०० एमबीबीएस विद्यार्थ्यांच्या प्रवेश क्षमतेसह महाविद्यालय सुरू करण्यासाठी परवानगीपत्र देण्याबाबत केंद्रीय आरोग्य मंत्रालयाने दाखल करण्यात आलेले दुसरे अपील मान्य केले आहे. तसेच राष्ट्रीय आयुर्विज्ञान आयोगाला महाविद्यालयास मान्यता देण्याबाबत अवगत करण्यात आले आहे.

या निर्णयामुळे अहिल्यानगरमध्ये शासकीय वैद्यकीय शिक्षणाची मुहूर्तमेढ रोवली जाणार असून, यंदाच १०० विद्यार्थ्यांना एमबीबीएस अभ्यासक्रमासाठी प्रवेश मिळण्याचा मार्ग मोकळा झाला आहे. पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, अहिल्यानगर येथे शैक्षणिक वर्ष २०२६-२७ पासून विद्यार्थ्यांना प्रवेश देण्यासाठी राष्ट्रीय आयुर्विज्ञान आयोगाकडून मान्यता मिळविण्याची प्रक्रिया सुरू होती.

## सावंतवाडीत 'सेवा संकल्प अभियाना'चा शुभारंभ

**आरोग्य जनजागृती, प्रतिबंधात्मक तपासणी व निरोगी जीवनशैलीच्या प्रसारावर भर**



**सिंधुदुर्ग (समर्थ गांवकरी)**

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या वाढदिवसानिमित्त तसेच त्यांच्या सार्वजनिक जीवनातील २५ वर्षांच्या कार्यकाळाच्या निमित्ताने सेवा कार्याचा लाभ सामान्य नागरिकांपर्यंत पोहोचविण्याच्या उद्देशाने 'सेवा संकल्प अभियान' राबविण्यात येत आहे. दि. १७ सप्टेंबर ते १७ ऑक्टोबर २०२६ या कालावधीत राबविण्यात येणाऱ्या या अभियानाचा शुभारंभ सावंतवाडी तालुक्यातील चराठे ग्रामपंचायतीमध्ये करण्यात आला. या अभियानाचे उद्घाटन जिल्हा परिषद अध्यक्ष प्रमोद कामत यांच्या हस्ते दीपप्रज्वलन करून करण्यात आले. यावेळी जिल्हा परिषद सदस्य विक्रांत सावंत, पंचायत समिती सभापती सुष्मिता जाधव, पंचायत समिती सदस्या उत्कर्षा गावकर, चराठे गावच्या सरपंच प्रचिती कुबल, उपसरपंच, ग्रामपंचायत सदस्य, गटविकास अधिकारी नीलेश जाधव, तालुका आरोग्य अधिकारी डॉ. रमेश कर्तस्कर, विविध विभागांचे अधिकारी व पदाधिकारी, ग्रामपंचायत कर्मचारी तसेच ग्रामस्थ उपस्थित होते. या अभियानांतर्गत नागरिकांमध्ये असंसर्गजन्य आजारांबाबत जनजागृती, प्रतिबंधात्मक आरोग्य तपासणी तसेच आजाराचा धोका असलेल्या व्यक्तींची लवकर ओळख करण्यावर विशेष भर देण्यात येणार आहे. महिला व किशोरवयीन मुलींची हिमोग्लोबिन तपासणी, आरोग्यविषयक जनजागृती, समुपदेशन तसेच आवश्यक पाठपुरावा करण्यात येणार आहे.याशिवाय रक्तदान शिबिरे, योग, ध्यान, शारीरिक सक्रियता आणि निरोगी जीवनशैलीचा प्रसार करण्यात येणार असून, व्यसनाधीनतेच्या दुष्परिणामांबाबतही जनजागृती केली जाणार आहे. अंगणवाडी तसेच समुदाय स्तरावर आयोजित विविध आरोग्यविषयक उपक्रमांमध्ये नागरिकांचा व्यापक सहभाग वाढविण्याचे उद्दिष्ट ठेवण्यात आले आहे. अभियानाच्या उद्घाटनप्रसंगी आयुष्मान आरोग्य मंदिर, चराठे येथे हिमोग्लोबिन तपासणी शिबिराचे आयोजन करण्यात आले. तसेच असंसर्गजन्य आजारांचा धोका असलेल्या व्यक्तींची आरोग्य तपासणी करण्यात आली. या विविध आरोग्य उपक्रमांचा ७३ लाभार्थ्यांनी लाभ घेतला. दि. १ सप्टेंबरपासून सुरू असलेल्या 'तिशीचा पल्ला-तपासणी अन् सल्ला' या मोहिमेबाबत जनजागृती व सर्वेक्षण करण्यात येत आहे. गणेश चतुर्थीच्या काळात 'आरोग्याचा श्रीगणेशा' या उपक्रमांतर्गत आरोग्य शिबिराचेही आयोजन करण्यात आले आहे.

## सोलापूर विभागातील ७ स्थानकांवर २०९ कोटींची अत्याधुनिक सिग्नलिंग यंत्रणा

**मुंबई (समर्थ गांवकरी)**

भारतीय रेल्वेने सिग्नलिंग व्यवस्था अधिक आधुनिक आणि सुरक्षित करण्याच्या दिशेने मोठे पाऊल उचलले आहे. मध्य रेल्वेच्या सोलापूर विभागातील सात स्थानकांवर इलेक्ट्रॉनिक इंटरलॉकिंग (EI) प्रणाली बसवण्यासाठी २०९ कोटी रुपयांच्या प्रकल्पाला मंजुरी देण्यात आली आहे. हाय डेन्सिटी नेटवर्क (HDN)-7 मार्गावरील रेल्वे वाहतूक अधिक सुरक्षित आणि कार्यक्षम करण्याच्या उद्देशाने हे काम हाती घेण्यात येणार आहे. ईआय प्रणाली मोहोळ, मुंढेवाडी, बाळे, सोलापूर, होतगी जंक्शन-होतगी ए केबिन, शहाबाद आणि वाडी जंक्शन येथे बसवण्यात येणार आहे. या मार्गावर इलेक्ट्रॉनिक इंटरलॉकिंगसोबतच कवच, ऑटोमॅटिक ब्लॉक सिग्नलिंग (-BS) आणि केंद्रीकृत वाहतूक नियंत्रण (CTC) यंत्रणांशी संबंधित कामांनाही मंजुरी देण्यात आली आहे.

# मोहरा छोटा असला तरी डाव मोठा!

## न्यू आर्ट्स मध्ये बुद्धिबळाचा बौद्धिक महासंग्राम

**अहिल्यानगर (समर्थ गांवकरी)**

सावध चाली, अचूक डावपेच आणि विजयासाठीची मानसिक कसरत... पटावरील प्रत्येक मोहरा महत्त्वाचा ठरत असताना, बुद्धिमत्तेचा हा रोमांचक खेळ पारनेर येथील न्यू आर्टस्, कॉमर्स ण्ड सायन्स महाविद्यालयात अनुभवायला मिळाला. सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ आणि अहिल्यानगर जिल्हा विभागीय क्रीडा समिती यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित तीन दिवसीय विभागीय बुद्धिबळ स्पर्धेला खेळाडूंचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला.

अहिल्यानगर जिल्ह्यातील विविध महाविद्यालयांमधील मुलांचे १८ आणि मुलींचे १६ अशा एकूण ३४ संघांनी स्पर्धेत सहभाग नोंदवत बुद्धिबळ कौशल्याचे दर्शन घडविले. प्रत्येक डावात प्रतिस्पर्ध्याच्या चालीचा अंदाज घेत, योग्य वेळी निर्णायक चाल खेळण्याचे आव्हान खेळाडूंसमोर होते. महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. रंगनाथ आहेर यांच्या हस्ते बुद्धिबळाच्या पटावर पहिली चाल खेळून स्पर्धेचे उद्घाटन करण्यात आले. यावेळी अहिल्यानगर विभागीय क्रीडा समितीचे सहसचिव डॉ. राहुल उबाळे, विविध महाविद्यालयांचे शारीरिक शिक्षण संचालक, प्राध्यापक आणि क्रीडाप्रेमी विद्यार्थी उपस्थित होते.

यावेळी मार्गदर्शन करताना प्राचार्य डॉ. रंगनाथ आहेर म्हणाले, बुद्धिबळ हा केवळ मनोरंजनाचा खेळ नसून एकाग्रता, संयम, तार्किक विचार आणि तात्काळ निर्णयक्षमता विकसित करणारी कार्यशाळा आहे. पटावरील विजयासाठी मोहरे नव्हे, तर त्यामागील विचार आणि दूरदृष्टी महत्त्वाची असते. विद्यार्थ्यांनी विजयासोबत शिस्त, प्रामाणिकपणा आणि खिलाडूवृत्ती जोपासावी, असे आवाहन त्यांनी केले.

स्पर्धेच्या तीनही दिवसांत सभागृहात शांततेसोबतच बुद्धिमत्तेचा तीव्र संघर्ष पाहायला मिळाला. घड्याळाच्या काट्याशी शर्यत, प्रतिस्पर्ध्याच्या प्रत्येक चालीचे सूक्ष्म निरीक्षण आणि शेवटच्या क्षणी डाव बदलण्याची क्षमता यामुळे सामने रंगतदार ठरले. मुलांच्या आणि मुलींच्या दोन्ही गटांत खेळाडूंनी रणनीती, संयम आणि कौशल्याची प्रभावी सांगड घातली. स्पर्धेच्या यशस्वी आयोजनासाठी जिमखाना विभागप्रमुख डॉ.



संजय गायकवाड, राष्ट्रीय छात्र सेना (NCC) प्रमुख प्रा. भरत डगळे आणि एनसीसी कॅडेट्स यांनी विशेष परिश्रम घेतले. विविध महाविद्यालयांतील शारीरिक शिक्षण संचालक व प्राध्यापकांच्या सहकार्याने स्पर्धा शिस्तबद्ध पद्धतीने पार पडली. विद्यार्थ्यांच्या बौद्धिक आणि क्रीडा विकासाला चालना देणाऱ्या या उपक्रमाचे क्रीडा क्षेत्रातून कौतुक होत आहे.

## शिक्षक सचिन डमरे यांना राज्यस्तरीय पुरस्कार

**श्रीगोंदा (समर्थ गांवकरी)**

श्रीगोंदा प्रतिनिधी: श्रीगोंदा तालुक्यातील काष्टी येथील रयत शिक्षण संस्थेचे जनता विद्यालय ज्युनिअर कॉलेजचे शिक्षक सचिन मच्छिंद्र डमरे डॉ.सी.व्ही. रामन विज्ञान उपक्रमशील राज्यस्तरीय शिक्षक पुरस्कार-२०२६ नुकताच मान्यवरांच्या हस्ते आदरपूर्वक प्रदान करण्यात आला आहे.

जनसेवा सामाजिक सांस्कृतिक शैक्षणिक प्रतिष्ठान, अहिल्यानगर आयोजित राज्यस्तरीय डॉ.सी.व्ही. रामन बालवैज्ञानिक परीक्षा कार्यशाळा, महात्मा फुले कृषी विद्यापीठ राहुरी येथे पार पडली. यामध्ये कर्जत तालुक्यातील बेनवडी येथील रहिवासी असलेले व सध्या काष्टी जनता विद्यालयासह इतर विद्यालयात पंधरा वर्षापासून ज्ञानदान करणारे सचिन डमरे यांना राज्यस्तरीय डॉ.सी.व्ही. रामन विज्ञान उपक्रमशील शिक्षक पुरस्कार डॉ राजकुमार अवसारे (संचालक, राज्य विज्ञान शिक्षण संस्था प्रादेशिक विद्या प्राधिकरण,नागपूर), सुमती कुलकर्णी (शास्त्रज्ञ,ड्झडउ खड्ठज-तिरुअनंतपुरम केरळ) यांच्या शुभहस्ते प्रदान करण्यात आला. यावेळी डॉ. विलास खर्चे (कुलगुरू, महात्मा फुले कृषी विद्यापीठ राहुरी) डॉ. महानंद माने (संकुल प्रमुख, छत्रपती शिवाजी महाराज कृषी विज्ञान संकुल मालेगाव तथा सचिव,सावित्रीबाई फुले शिक्षण मंडळ, म.फुले कृषी विद्यापीठ राहुरी), डॉ. साताप्पा खरबडे (अधिवक्ता, महात्मा फुले कृषी विद्यापीठ राहुरी) व प्राचार्य अरूण तुपविहीरे उपस्थित होते.



विज्ञान विषयाचे शिक्षक डमरे यांनी त्यांच्या कार्यकाळात शाळेतील विद्यार्थ्यांसाठी विविध स्पर्धा परीक्षा,

विज्ञान विषयाचे नाविन्यपूर्ण अध्यापन, बुद्धिमत्ता विषयाचे सखोल अध्यापन, मुलांना सोप्या भाषेत दिलेल्या शिक्षणरुपी ज्ञानदानाची वरीष्ठांनी दखल घेऊन त्यांना राज्यस्तरीय पुरस्कार देण्यात आला आहे.

पुरस्कार मिळाल्या बद्दल सचिन डमरे यांचे राज्यांचे माजी मंत्री बबनराव पाचपुते, कर्जतचे आमदार रोहित पवार, विधानसभा सभापती प्रा.रामजी शिंदे, काष्टी गावचे लोकनियुक्त सरपंच साजन पाचपुते, यांच्यासह रयत शिक्षण संस्थेतील विविध मान्यवर व्यक्ती कडून अभिनंदन करुण शुभेच्छा दिल्या आहेत.

## विद्यार्थ्यांनी घडविला भक्ती आणि संगीताचा सुरेख संगम

**जुन्नर (समर्थ गांवकरी)**

पुणे जिल्हा शिक्षण मंडळाचे,अण्णासाहेब वाघिरे महाविद्यालय,ओतूर येथील माजी विद्यार्थी आणि विद्यमान विद्यार्थ्यांच्या सहकार्याने साकारलेल्या 'गीताचा भव्य प्रकाशन सोहळा उत्साहात संपन्न झाला.इंद्रजीत आणि वृंदा आदित्य कामठे यांना हे गीत समर्पित केले आहे.नाद मराठी एंटरटेनमेंट व शिवराय फिल्मस प्रस्तुत

'ओझरच्या विघ्नेश्वरा' निर्मिती-आदित्य कामठे व चैतन्य मनोज चौधरी, सह- निर्मिती राजेंद्रकुमार देसाई, कार्यकारी निर्माते - सुशील पिंगळे,कथा पटकथा व दिग्दर्शन-ओंकार शिवाजी भालेराव,कलाकार-चैतन्य चौधरी,वल्लरी शिंदे,संचिता खंडागळे,गीतकार व संगीत कार -योगीराज पालवे,गायक - पार्थ गरुड,दिशा वाव्हळ, सहगायक-संस्कृती क्षीरसागर, संगीत संयोजक श्रेयस मिसाळ,छायाचित्रण आफाण मोमीन, सहदिग्दर्शक-मानसी जाधव सहाय्यक दिग्दर्शक-श्रद्धाअहिनवे,संकलन- श्रीनिवास गज्ञलवार या सर्वांचे योगदान बहुमूल्य आहे. या निर्मितीसाठी श्री. विघ्नेश्वर देवस्थान ट्रस्ट ओझर अध्यक्ष बाळकृष्ण कवडे,सर्व बिश्वस्त मंडळ यांनी आभार मानले आहेत व कौतुक केले आहे.

मराठी मातीच्या,समृद्ध सांस्कृतिक परंपरेचा, मातीत ल्या संस्कारांचा व महाविद्याल याशी असलेल्या आजी माजी विद्यार्थ्यांच्या भावनिक नात्या चा सुंदर आविष्कार या गीता तून साकार करण्यात आला आहे.आपली संस्कृतीआपली ओळख! या भावनेला केंद्र स्थानी ठेवून गीत साकारण्यात आले आहे.

## ओतूर पोलिसांकडील १० प्रकरणांत आरोपींना दंडाची शिक्षा

**ओतूर (समर्थ गांवकरी)**

जुन्नर तालुक्यातील ओतूर पोलिस ठाण्याच्या हद्दीत दाखल मोटार वाहन कायदा तसेच भारतीय न्याय संहितेअंतर्गत विविध प्रकरणांमध्ये आरोपींनी न्यायालयात गुन्हा कबूल केल्यानंतर जुन्नर न्यायालयाने त्यांना दंडाची शिक्षा सुनावली. १२ सप्टेंबर रोजी झालेल्या लोकअदालतीत ९, तर १७ सप्टेंबर रोजी एका प्रकरणात अशा एकूण १० प्रकरणांत ही कारवाई झाली असल्याची माहिती सहायक पोलिस निरीक्षक ज्ञानेश्वर बाजगिरे यांनी दिली.

१२ सप्टेंबर रोजी जुन्नर येथील लोकअदालतीत मोटार वाहन कायदा कलम १८५ अंतर्गत दाखल सहा प्रकरणांमध्ये प्रत्येकी १० हजार रुपये, तर भारतीय न्याय संहितेच्या कलम २८५ व २८१ अंतर्गत दाखल तीन प्रकरणांमध्ये प्रत्येकी ५०० रुपये दंड ठोठावण्यात आला.

मोटार वाहन कायदा कलम १८५ अंतर्गत राजू उत्तम राठोड (रा. उंब्रज नं. २), गणेश ज्ञानदेव भापकर (रा. वडुले), मिलिंद सुनील औटी (रा. हिवरे खुर्द), भीमा शंकर वाजे (रा. कळस बु.), रामभाऊ हरिभाऊ काळे (रा. साकुर मांडवे) आणि तेजस राजेंद्र कोंडे (रा. धामणखेल) यांना प्रत्येकी १० हजार रुपये दंडाची शिक्षा झाली.भारतीय न्याय संहितेच्या कलम २८५ अंतर्गत सदाशिव लक्ष्मण लांडगे (रा. ब्राम्हणवाडा) यांना, तर कलम २८१ अंतर्गत अंकुश बाळाशीराम लोहोटे व सौरभ संतोष भिसे (दोघेही रा. डिंगोरे) यांना प्रत्येकी ५०० रुपये दंड ठोठावण्यात आला. दरम्यान, १७ सप्टेंबर रोजी ओतूर पोलिस ठाण्यात दाखल गुन्हा मोटार वाहन कायदा कलम १८५ अंतर्गत प्रकरणात आरोपी राजेश रामदास बुरकुल (वय ३३, रा. बोऱ्हाडेवाडी, मोशी) यांनी न्यायालयात गुन्हा कबूल केल्याने त्यांना १० हजार रुपये दंडाची शिक्षा सुनावण्यात आली. या प्रकरणाची सुनावणी जे.एम.एफ.सी. कोर्ट, जुन्नर येथे झाली.

## हिंदी भाषा ही विविध भाषांना जोडणारा महत्त्वाचा दुवा:-डॉ. राजेश रसाळ

**जुन्नर (समर्थ गांवकरी)**

पुणे जिल्हा शिक्षण मंडळाचे,अण्णासाहेब वाघिरे कला,विज्ञान व वाणिज्य महाविद्यालय,ओतूर येथील हिंदी विभागाच्या वतीने हिंदी दिवस समारोह उत्साहात संपन्न झाला. हिंदी भाषेचे महत्त्व,तिची समृद्ध परंपरा आणि विद्यार्थ्यांमध्ये हिंदी भाषेविषयीची आवड निर्माण करण्याच्या उद्देशाने या कार्य क्रमाचे आयोजन करण्यात आले.कार्यक्रमाच्या अध्यक्ष-स्थानी महाविद्यालयाचेप्राचार्य डॉ.रमेश शिरसाट होते.

कार्यक्रमास प्रमुख अतिथी म्हणून उपअभियंता एन. एन. घाटुले उपस्थित होते. तसेच उपप्राचार्य डॉ.के.डी. सोनावणे मराठी विभागप्रमुख डॉ.वसंत गावडे आणि छ्डड प्रमुख डॉ. राजेंद्र आंबवणे यांची प्रमुख उपस्थिती होती.कार्यक्रमाचे प्रास्ताविक हिंदी विभागप्रमुख डॉ. राजेश रसाळ यांनी केले. आपल्या मनोगतात त्यांनी हिंदी भाषा दिन साजरा करण्यामागील ऐतिहासिक पार्श्वभूमी आणि हिंदी भाषेचे राष्ट्रीय जीवनातील महत्त्व स्पष्ट केले.हिंदी भाषेची समृद्ध परंपरा,साहित्यिक वैभव व संवादाचे प्रभावी माध्यम म्हणून असलेली भूमिका याविषयी त्यांनी विद्यार्थ्यांना माहिती दिली.

हिंदी भाषेचा गोडवा आणि व्यापकता अत्यंत वैशिष्ट्यपूर्ण असून हिंदी ही इंग्रजी तसेच विविध प्रादेशिक भाषांना जोडणारा महत्त्वाचा दुवा आहे, असे डॉ. राजेश रसाळ यांनी सांगितले.भारतासारख्या बहुभाषिक देशामध्ये विविध भाषिक समाजघटकांमध्ये संवाद आणि परस्पर समन्वय निर्माण करण्यामध्ये हिंदी भाषेची महत्त्वपूर्ण भूमिका असल्याचे त्यांनी नमूद केले. प्रमुख अतिथी एन.एन.घाटुले



यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना भाषेच्या माध्यमातून व्यक्तिमत्त्व विकास, संवाद कौशल्य आणि सामाजिक समन्वय साधता येतो, असे सांगितले. विद्यार्थ्यांनी हिंदी सह इतर भाषांचेही ज्ञान आत्मसात करून आपल्या ज्ञानाच्या कक्षा रुंदावाव्यात, असे आवाहन त्यांनी केले.

अध्यक्षीय मनोगतात प्राचार्य डॉ. रमेश शिरसाट यांनी हिंदी भाषादिनाचे महत्त्वअधोरेखित करत विद्यार्थ्यांनी भाषेचा केवळ अभ्यास न करता तिचा दैनंदिन जीवनात प्रभावी वापर करावा, असे सांगितले. भाषा ही केवळ संवादाचे माध्यम नसून संस्कृती, विचार आणि भावनांची वाहक असल्याचे त्यांनी नमूद केले.

कार्यक्रमास उपप्राचार्य डॉ. के. डी.सोनावणे,मराठी विभाग प्रमुख डॉ. वसंतराव गावडे, छ्डड प्रमुख डॉ.राजेंद्र आंबवणे तसेच प्राध्यापक आणि विद्यार्थी उपस्थित होते.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा. विनायक कुंडलिक यांनी केले.

# सहकार महर्षी नागवडे कारखाना सभासदांच्या विश्वासाला तडा जाऊ देणार नाही; दिवाळीत उर्वरित १५० रुपये देणार : राजेंद्रदादा नागवडे

**सहकार महर्षी नागवडे कारखान्याची ६१ वी वार्षिक सभा; ५ ऑक्टोबरला बॉयलर पेटणार, पाणी प्रश्नावर वादळी चर्चा**

**श्रीगोंदा (समर्थ गांवकरी)**

सहकार महर्षी शिवाजीराव नागवडे सहकारी साखर कारखान्याच्या सभासद ऊस उत्पादकांच्या विश्वासाला तडा जाऊ दिला जाणार नाही. यापुढेही सभासद व ऊस उत्पादकांना योग्य वेळी उच्चांकी ऊसदर देण्यासाठी संचालक मंडळ कटिबद्ध राहील, अशी ग्वाही कारखान्याचे अध्यक्ष राजेंद्रदादा नागवडे यांनी दिली. तसेच येत्या ५ ऑक्टोबर रोजी कारखान्याचा बॉयलर पेटविण्यात येणार असून, मागील गाळप हंगामातील उर्वरित १५० रुपये प्रतिटन दिवाळीपूर्वी सभासदांच्या खात्यात जमा करण्यात येतील, अशी महत्त्वपूर्ण घोषणाही त्यांनी केली.

सहकार महर्षी नागवडे सहकारी साखर कारखान्याची ६१ वी वार्षिक सर्वसाधारण सभा कारखाना कार्यस्थळावर अध्यक्ष राजेंद्रदादा नागवडे यांच्या अध्यक्षतेखाली खेळीमेळीच्या वातावरणात पार पडली. सभेपुढे मंजुरीसाठी ठेवण्यात आलेले एकूण दहा विषय उपस्थित सभासदांनी एकमताने मंजूर केले.

सभेला उपाध्यक्ष मेघाताई औटी, माजी उपाध्यक्ष भगवानराव पाचपुते, बाबासाहेब भोस, घनश्याम शेलार, दत्तात्रय पानसरे, राजेंद्र म्हस्के, केशवराव मगर, बाबासाहेब इथापे, रावसाहेब काकडे, अरुणराव पाचपुते, हरिदास शिर्के, सुरेश लोखंडे, दिलीप वागस्कर, सुधीर फराटे, आबासाहेब जगताप, सर्व आजी-माजी संचालक, कार्यकारी संचालक प्रवीण शिंदे यांच्यासह मोठ्या संख्येने सभासद उपस्थित होते.

### ३५ सभासदांच्या प्रश्नांना दिली उत्तरे

सभेत तब्बल ३५ सभासदांनी अहवालावर विविध प्रश्न उपस्थित करत आपली मते मांडली. अध्यक्ष राजेंद्रदादा नागवडे यांनी सर्व प्रश्नांना समर्पक उत्तरे देत कारखान्याच्या कामकाजाबाबत सविस्तर भूमिका स्पष्ट केली.

### डिंभे-माणिकडोह, घोड-कुकडी आणि साकळाईवर वादळी चर्चा

सभेतील सर्वाधिक लक्षवेधी ठरलेली चर्चा डिंभे-माणिकडोह बोगदा, घोड-कुकडी आणि साकळाई सिंचन योजना या पाणी प्रश्नांवर झाली. माजी सभापती पुरुषोत्तम लगड आणि ज्येष्ठ नेते घनश्याम शेलार यांनी या योजनांमुळे भविष्यात तालुक्यात निर्माण होणाऱ्या पाणीटंचाईबाबत शंका व्यक्त करत सभासदांचे लक्ष वेधले.

ज्येष्ठ नेते राजेंद्र म्हस्के यांनी सहकार चळवळीचे महत्त्व अधोरेखित करत, सहकार टिकला तर ऊस उत्पादक शेतकरी वाचेल, असे सांगितले. खाजगी साखर कारखान्यांच्या वाढत्या स्पर्धेच्या




पार्श्वभूमीवर सहकारी कारखान्याला ऊस देण्याचे आवाहन त्यांनी केले. तसेच घोड आणि साकळाई पाणी वादावर सर्व नेते एकत्र येऊन लवकरच पाणी परिषद घेणार असल्याची माहिती दिली.

घनश्याम शेलार यांनी ६१ वर्षांच्या संस्थेला काळानुसार बदलांची गरज असल्याचे सांगत कारखान्याच्या अहवालातील नोंदींबाबत काही मौलिक सूचना मांडल्या.

अध्यक्षीय भाषणात राजेंद्रदादा नागवडे यांनी सहकार महर्षी शिवाजीराव नागवडे (बापू) यांच्या कार्याची आठवण करून देत, सहकार, शिक्षण आणि सिंचन क्षेत्रातील त्यांच्या योगदानाचा गौरव केला. त्यांनी सांगितले की, बापूंनी उभारलेला १२०० टन क्षमतेचा कारखाना आज संचालक मंडळाच्या काटकसरीच्या धोरणामुळे ७००० टन क्षमतेपर्यंत सक्षमपणे चालवला जात आहे.

हे पत्रक मालक, मुद्रक, प्रकाशक, संपादक डॉ. विश्वासराव आनंदराव आरोटे यांनी सोनेरी छत्रपती प्रिंटर्स, भिंगारे गोडावूनजवळ, अकोले, ता. अकोले, जि. अहमदनगर - ४२२६०१ (महाराष्ट्र) येथे छापून दैनिक समर्थ गांवकरी कार्यालय, भिंगारे गोडावूनजवळ, अकोले, ता. अकोले, जि. अहमदनगर - ४२२६०१ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. This newspaper is printed by owner, printer, publisher, editor Vishwasrao Anandrao Arote at Soneri Chhatrapati Printers, Near Bhingare Godown, Akole, Tq. Akole, Dist. Ahmednagar - 422601.
पुणे निवासी संपादक : प्रतिक गंगणे, मुंबई विभागीय संपादक : दशरथ चव्हाण, व्यवस्थापक : संजय फुलसुंदर कार्यकारी संपादक : नवनाथ जाधव, ॲड. रचना भालके (हायकोर्ट), ठाणे
पुणे विभागीय कार्यालय : फ्लॅट नं. ४०६, व्यंकटेश विश्व, अभिरूची परिसर समोर, पारे कंपनी रोड, नऱ्हे, पुणे - ४११०४१ / ठाणे विभागीय कार्यालय : अ-१, भाग्यश्री छाया, बेसमेंट, आवाज रेडिओ जवळ, डेअरी कॉटेज, इदुलजी रोड, चाराई, ठाणे (वे.)/
कोकण विभागीय कार्यालयाचा पत्ता : शकुंतल बिल्डिंग, गाळा क्र. २, सेक्टर ५, कोपरखैरणे, नवी मुंबई ४००७०९